# गरवारे बालभवनचा बालदिन कार्यक्रम २०१५

दरवर्षी बालदिनानिमित्त पुण्यातली काही बालभवनं आणि मुलांसाठी काम करणाऱ्या इतर संस्था एकत्र येऊन बालदिन साजरा करतात.

या वर्षी दिनांक २९ नोव्हेंबर, २०१५ रविवार रोजी गरवारे बालभवन येथे असा बालदिन साजरा झाला. यामध्ये गरवारे बालभवन, महेश बालभवन, आपलं बालभवन, बालरंजन केंद्र, एल. बी. एस्. बालभवन, परिसस्पर्श बालभवन, यशश्री बालभवन, बालविकास केंद्र–शनिवार पेठ, किलबिल बालोद्यान आणि बालविकास केंद्र–कोथरूड या बालभवनांनी यजमानपद स्विकारलं होतं, तर स्वाधार, वंचित विकास, आपलं घर, ज्ञानदेवी, सर्वेषां सेवासंघ, खेळघर, एकलव्य न्यास, कासरवाडी बालभवन आणि मशाल या संस्थांची मुलं पाहुणे म्हणून सहभागी झाली.

कार्यक्रमाचे उदघाटन एस.एस.सी. बोर्डाचे सहसचिव मा. श्री अनिल गुंजाळ यांच्या हस्ते झाले. मुलांसाठी वैशिष्ठ्यपूर्ण खेळ, प्लॅस्टिकच्या बाटल्यांची भिरभिरी, कोलाज, गाणी–गोष्टी, पाणीबचत आणि कचरा व्यवस्थापन यावरील रोल–प्ले इत्यादी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सर्व गोष्टींमधे मुलांचा उत्साहपूर्ण सहभाग होता. मुलांना खूप मजा आली. एकत्र बसून नाश्ता आणि जेवण करणं यात मुलं रमली होती.

उदघाटन प्रसंगी बालभवनच्या सल्लागार डॉ. श्यामला वनारसे, ट्रस्टी डॉ. श्रीधर राजपाठक, ज्ञानदेवी संचालिका डॉ. अनुराधा सहस्रबुध्दे, बालभवनच्या संचालिका शोभा भागवत आणि डॉ. विदुला म्हैसकर उपस्थित होत्या. पूर्ण कार्यक्रमाचे नियोजन किलबिल बालोद्यानच्या संचालिका भाग्यश्री हलदुले यांनी केले होते.

सर्व संस्थातील आणि बालभवनांतील मिळून एकूण २०० मुलांनी कार्यक्रमाची मजा लुटली.



